MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



शिरूर कासार ।वार्ताहर

आर्वी येथील सामाजिक कार्यकर्ते व समाजसेवक श्री शेषराव मारुती आरेकर यांचे चिरंजीव महेश शेषराव आरेकर यांची जिल्हा परिषद रत्नागिरी येथे बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर निवड झाली असून ते रत्नागिरी येथे बांधकाम विभागात रुजू झालेली आहेत. तसेच राहुल गंगाराम भोकरे यांची इंडियन नेव्ही मध्ये मेडिकल असिस्टंट म्हणून निवड झाली असून ते लवकरच तेथे रुजू होत आहेत श्री महेश आरेकर व श्री राहुल भोकरे हे जिद्द चिकाटी व बुद्धिमत्ता या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यामुळे त्यांचे परिसरामध्ये कौतुक होत आहे..... आज दिनांक ३- ११- २०२४ रोजी, त्यांचा आर्वी येथे श्री दिगंबर मळेकर सेवानिवृत्त चीफ इंजिनिअर व आरेकर व भोकरे परिवाराचे स्नेही व मित्रपरिवाराकडून गौरव व सत्कार करण्यात आला..श्री महेश आरेकर व राहुल भोकरे यांच्या निवडीबद्दल परिसरामध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -४८ | सोमवार दि.०४ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -48 | MONDAY DT.04 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## अखेर संगीता ठोंबरेची माघार...........!

# संगीता ठोंबरे ची माघार साठेंना सहकार्य ?

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार संगीता ठोंबरे या निवडणुकीत रंगात आणणार असं वाटतं असताना सोमवारी अर्ज वापस घेण्याच्या दिवशी संगीता ठोंबरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या सोबत झालेल्या चर्चा नुसार माघार घेतली.

आता चौरंगी ऐवजी तिरंगी लढत होईल अशी अपेक्षा आहे परंतु इंजिन किती पळेल हे काही अजून तरी समजतं नाही आता पृथ्वीराज साठे हे प्रबळ दावेदार ठरत आहेत सकाळी मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेत असल्याचे माध्यमांना

सांगितले होते. त्यामुळे प्रा. संगीता ठोंबरे यांना दिसणारा आशेचा किरण ही धुसर झाला होता. यासर्व पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज वापस घेण्यासाठी काही मिनीटांचा अवधी शिल्लक राहिलेला असतानाराष्ट्रवादी



काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या नेत्या खा सुप्रिया ताई सुळे व बीडचे खा बजरंग सोनवणे यांच्या शिष्टाईमुळे प्रा संगीता ताई ठोंबरे यांनी निवडणुकी मधून माघार घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना आपला पाठिंबा जाहीर केला.

दरम्यान माजी आमदार प्रा. सौ. संगीता ठोंबरे यांनी आपला उमेदवारी अर्ज उमेदवारी अर्ज मागे घेतल्या मुळे केज मतदार संघात माजी आ पृथ्वीराज साठे यांना बळकटी मिळाली आहे हे मात्र निश्चित.सकाळी मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेत असल्याचे माध्यमांना

सांगितले होते. त्यामुळे प्रा. संगीता ठोंबरे यांना दिसणारा आशेचा किरण ही धुसर झाला होता. यासर्व पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज वापस घेण्यासाठी काही मिनीटांचा अवधी शिल्लक राहिलेला असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या नेत्या खा सुप्रिया ताई सुळे व बीडचे खा बजरंग सोनवणे यांच्या शिष्टाई मुळे प्रा संगीता ताई ठोंबरे यांनी निवडणुकी मधून माघार घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना आपला पाठिंबा जाहीर केला.


दरम्यान माजी आमदार प्रा. सौ. संगीता ठोंबरे यांनी आपला उमेदवारी अर्ज उमेदवारी अर्ज मागे घेतल्या मुळे केज मतदार संघात माजी आ पृथ्वीराज साठे यांना बळकटी मिळाली आहे हे मात्र निश्चित.

# पंकजाताई मुंडे यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर दिलीप बीडगर यांची माघार ; रासपनेही उमेदवार दिला नाही

## परळीत महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या विजयाचा मार्ग झाला सुकर

परळी : 'घार उडे आकाशी, लक्ष तिचे पिलापाशी' या म्हणीचा प्रत्यय भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्याबाबत नेहमीच अनुभवाला येत असतो. परळी मतदारसंघात भावाच्या मदतीला मदतीला धावून येत या बहिणीने केलेल्या मध्यस्थीनंतर भाजपचे धनगर समाजाचे नेते दिलीप बीडगर यांनी आपला उमेदवारी अर्ज आज मागे घेतला, त्यामुळे महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या विजयाचा मार्ग आता सुकर झाला आहे, याशिवाय आ. पंकजाताईंच्या शब्दाला मान देऊन रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी त्यांच्या रासपचा देखील उमेदवार मतदारसंघांत दिला नाही, हे विशेष..!

विधानसभा निवडणूकीचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. परळी मतदारसंघांत भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना व मित्रपक्षांचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या विरोधात





धनगर समाजाचे नेते दिलीप बीडगर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

'घार उडे आकाशी, लक्ष तिचे पिलापाशी' या म्हणीप्रमाणे भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे सुरवातीपासून मतदारसंघावर लक्ष ठेवून आहेत. भावाच्या मदतीला धावून जात या बहिणीने यशस्वी शिष्टाई करत बीडगर यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावला. आ. पंकजाताईंच्या नुसत्या एका शब्दावर व त्यांच्या मध्यस्थीनंतर बीडगर यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. याशिवाय रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी आ. पंकजाताईंच्या शब्दाला मान देत मतदारसंघांत रासपचा उमेदवार दिला नाही. भावासाठी मदतीचे नाते निभावत आ. पंकजाताईंनी घेतलेल्या या दोन्ही महत्वाच्या भूमिकांमुळे महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या विजयाचा मार्ग आता सुकर झाल्याचे पहायला मिळत आहे.

आ. पंकजाताईंमुळे बिनशर्त माघार – दिलीप बीडगर, अशोक लोढा यांची प्रतिक्रिया

आ. पंकजाताईंनी आम्हाला या अगोदरही संधी दिली होती, भविष्यातही त्या देत राहतील हा मला विश्वास आहे, त्यामुळे त्यांच्या विनंतीला मान देऊन मी बिनशर्त माघार घेतली आहे अशी प्रतिक्रिया दिलीप बीडगर व बीड विधानसभेचे उमेदवार अशोक लोढा यांनी दिली. लोढा यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.



## विधानसभा निवडणुकीत आ. सोळंके यांना मातंग समाजाच्या सर्व प्रमुख नेत्यांचा पाठींबा

लहुजी विद्रोही,आझाद क्रांती सेना, एबीएस फोर्स व अमोल शेरकर युवामंचचा पाठींबा

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुक २०२४ मध्ये आ.प्रकाश सोळंके यांना लोकप्रियता मिळत असुन लहुजी विद्रोही सेना,अण्णाभाउ साठे क्रांती फोर्स व अमोल शेरकर युवामंच आदी मातंग समाजाच्या प्रमुख असलेल्या संघटनांनी आ.सोळंके यांना आज दि.३ नोव्हेंबर २०२४ रोजी पाठींबा दिला आहे.

विधानसभा निवडणुक अवघ्या काही दिवसांवर आली आहे. उमेदवार प्रत्यक्ष गाठी भेटींवर भर देत आहेत. विद्यमान आ.प्रकाश सोळंके यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी जाहिर झालेली असुन मतदारसंघात आ.प्रकाश सोळंके यांना मतदार पसंती देत आहेत. दि.३ नोव्हेंबर २०२४ रोजी लहुजी विद्रोही सेना,आझाद क्रांती सेना, अमोल शेरकर युवामंच व अण्णाभाउ साठे क्रांती फोर्स च्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, शिवसेना,आरपीआय आठवले गट,बहुजन विकास मोर्चा पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रकाश सोळंके यांना लहुजी विद्रोही सेनाप्रमुख भास्क्र शिंदे, आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, अमोल शेरकर युवामंचचे अमोल शेरकर व अण्णाभाउ साठे क्रांती फोर्सचे जिल्हाध्यक्ष मिलींद मुजमुले यांनी पत्र देत पाठींबा जाहिर दिला आहे. दरम्यान विधानसभा निवडणुकीत आ. सोळंके यांना मातंग समाजाच्या सर्व प्रमुख नेत्यांचा पाठींबा मिळाला आहे. यावेळी मा.सभापती जयसिंग सोळंके,दिनकर शिंदे,एकनाथ मस्के, रंजित कसबे यांची उपस्थिती होती.

## लिंबागणेश येथील रखडलेल्या जलजीवन, स्मशानभूमीच्या कामांचा निवडणुकीत

# आ.संदिप क्षीरसागरांना फटका बसणार :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल असणाऱ्या लिंबागणेश येथील आ.संदिप क्षीरसागर यांच्या गुत्तेदार कार्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे जलजीवन, स्मशानभूमीची कामे रखडलेल्या अवस्थेत असुन यामुळे लिंबागणेश ग्रामस्थांना विकत पाणी घेण्याची वेळ आली आहे तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.तर ८ लक्ष रूपये मंजूर झालेल्या स्मशानभूमीचे काम पावणे दोन वर्षांपासून रगडलेल्या अवस्थेत असुन अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असुन मृतदेहाची हेळसांड होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र संतापाची भावना असुन याचा आ.संदिप क्षीरसागर यांना विधानसभा निवडणुकीत फटका बसणार असल्याचे ग्रामस्थांनी बोलुन दाखवले.

लिंबागणेश येथील स्मशानभूमीची दुरावस्था असुन पत्रे उडुन गेलेले, बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असल्याने नविन स्मशानभूमी बांधकामासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी स्मशानभूमीत सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते.याची दखल आ.संदिप क्षीरसागर यांनी घेत जिल्हा वार्षिक (दहन/ दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षांकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. मात्र स्मशानभूमीचे काम आ.संदिप क्षीरसागर यांचे कार्यकर्ते करत असुन त्यांच्या नाकर्तेपणामुळे पावणे दोन वर्षांपासून काम रखडलेल्या अवस्थेत असुन पावसाळयात दि.१ सप्टेंबर रोजी कै.केशरबाई तुळशीराम नाईकवाडे यांचा अंत्यविधी दरम्यान पाऊस आल्याने तारांबळ उडाली होती. ताडपत्रीने झाकून अंत्यविधी करण्यात आला होता. तर दि.२




नोव्हेंबर रोजी कासार समाजातील सीमा महेश साळवे यांच्या अंत्यसंस्कार करताना सभोवताली उगवलेले गवत, झाडेझुडपे यामुळे अंत्यसंस्कार करण्यास अडचणींना तोंड द्यावे लागले. पावणे दोन वर्षांपासून रखडलेल्या स्मशानभूमीच्या कामामुळे मृतदेहांची हेळसांड होत असुन आ.संदिप क्षीरसागर यांच्या बद्दल ग्रामस्थांनी तिव्र नाराजी व्यक्त केली असुन याचा फटका आ.संदिप क्षीरसागर यांना निवडणुकीत बसणार असल्याचे बोलले जात आहे.

भारत सरकारच्या जनशक्ती मंत्रालयाने २०१९ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक ग्रामिण कुटुंबाला दरडोई दररोज ५५ लिटर नळाचे पाणी नियमित पुरविण्याच्या उद्देशाने महत्वकांक्षी योजना अंमलात आणली.लिंबागणेश येथील जलजीवन योजनेसाठी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला मात्र आ.संदिप क्षीरसागर यांचे कार्यकर्ते यांनी कंत्राटदार यांच्या संगनमताने कागदोपत्रीच बोगस कामे करत शासनाची दिशाभूल करून निधी घशात घातला. त्यामुळे ग्रामस्थांवर विकत पाणी घेण्याची तर महिलांवर पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे. संबंधित प्रकरणात डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी बीड यांना लेखी तक्रारीनंतर जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद बीड यांना संबंधित प्रकरणी निवेदनातील मुद्द्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी

## आचार्य टाकळी येथे परळी मतदार संघाचे राजेसाहेब देशमुख यांनी

# दिवाळी निमित्ताने शुभेच्छा दिल्या व मतदान रुपी आशीर्वाद घेतले

**प्रतिनिधी । सिरसाळा**

**परळी विधानसभा २३३ मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी आचार्य टाकळी येथे सकाळी ठीक नऊ वाजता मतदारांच्या घरोघरी जाऊन भेटी घेतल्यावर दिवाळी निमित्ताने शुभेच्छा दिल्या त्याच त्यांच्याकडून मतदान रुपी आशीर्वाद मागितला गावातील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देऊन त्यांना मतदान रुपी आशीर्वाद दिला.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी .या गावचे ज्येष्ठ नागरिक श्री भास्कर अण्णा आचार्य हे होते. व अडवोकेट. माधव आप्पा जाधव अनिल जाधव सर शरद राठोड व चव्हाण अशोक देशमुख पत्रकार. बाळासाहेब गरड .लोकाशाचे पत्रकार. मिलिंद चोपडे. हेही उपस्थित होते. . येथील युवा नेते व लोकसभेतील बजरंग बाप्पा सोनवणे यांचे कट्टर समर्थक गजानन भैया आचार्य यांनी सूत्रसंचालन केले व या आचार्य टाकळी येथील मतदारांनी लोकसभेतील उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना लीड देऊन व परळी मतदार संघाचे भावी आमदार. राज साहेब देशमुख यांनाही बजरंग बप्पा सोनवणे यांना लीड आहे तशीच तुम्हाला भेट देऊ असा विश्वास गावकऱ्यांनी दिला आहे. . यावेळी स्वतः राजेसाहेब देशमुख यांनी गावांमध्ये रॅली काढून व गाठीभेटी घेऊन सर्वांच्या वेदना ऐकून घेतल्या व ते बोलताना म्हणाले की वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना बंद केला आहे वाघाळा सहकारी साखर कारखाना बंद केला आहे. सिरसाळा एमआयडीसी कधी येणार व पुस गावचा कारखाना तुमचा कधी होणार असे उदाहरणे देऊन येथील युवा पिढीला म्हणाले की मला आमदार करा मी तुम्हाला नोकऱ्या देतो व मी आमदार नसून तुम्हीच आमदार असेल काम करतो राज साहेब देशमुख यांनी शिक्षण व आरोग्य यांच्यावर जास्त लक्ष आहे .मी एक तुमचा नोकर आहे असे बोलून सर्वांना शुभेच्छा दिल्या .दौऱ्याचे आयोजक. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गट यांनी केले दौऱ्यानिमित्त हनुमान मंदिराढमध्ये एक संवाद बैठक ठेवली होती या बैठकीत गावातील उपसरपंच अंगद आचार्य. व



उद्योजक. बंडू काका घोडके .यांच्यासह अनेक युवक उपस्थित होते यामध्ये बजू भैया घोडके परमेश्वर आचार्य बलभीम घोडके पुरुषोत्तम घोडके सुनील आचार्य हनुमंत आचार्य दत्ताराव घोडके विकास आचार्य अंकुश आचार्य असंख्य लोकांचा प्रतिसाद बघून आचार्य टाकळी यथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद चंद्र पवार गटाचे उमेदवार राज साहेब देशमुख यांनी असाच प्र तिसाद मला द्या व मी तुमच्या सदैव कामासाठी कटिबद्ध आहे असा विश्वास यावेळी बोलताना दिला. यावेळी साय. दैनिक आरंभ परळी तालुका प्रतिनिधी बापू किरवले. यांचा सत्कार करण्यात आला व मी उपस्थित होतो.

# विधानसभेच्या विजयासाठी अमरसिंह पंडित यांनी डॉ.योगेश क्षीरसागरांना दिल्या शुभेच्छा

बीड (प्रतिनिधी)

महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी शहरातील शिवछत्र निवासस्थानी भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांना दीपावली पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या व आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी डॉ.योगेशभैय्यांचा सत्कार करून निवडणूक जिंकण्यासाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.



याप्रसंगी राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, सुनील पाटील, नगरसेवक शुभम धुत, नबील जमा, शुभम कातांगळे, रौफ मोमीन, बाबा खान, सागर वाव्हुळ, अभिनंदन सारडा आदी उपस्थित होते. अमरसिंह पंडित यांनी बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोठी ताकद असून पक्षाला मानणारा वर्ग असल्याचे सांगितले. आगामी काळात ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड विधानसभा निवडणुकीत विजय मिळविण्याच्या दृष्टीने रणनीती कशी असावी, यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले.

पाडव्यानिमित्त गर्दी

बीड शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालय परिसरात दीपावली पाडव्यानिमित्त स्नेहमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिकांसह अनेकांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह कुटुंबीयांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.

# राजमुद्रा चषक सावरगाव – २०२४ मिरी संघाने फटकावला

आष्टी :- मौजे सावरगाव तालुका आष्टी जिल्हा बीड येथे दीपावली निमित्त दरवर्षीप्रमाणे नाथ स्टेडियम येथे शिवशक्ती क्रिकेट क्लब व राजमुद्रा क्रिकेट क्लबच्या संयुक्त विद्यमाने राजमुद्रा क्रिकेट चषक २०२४ या स्पर्धेचे आयोजन करण्यात या स्पर्धे च्या दुसर्या पर्वात अतिशय पाहण्या जोगे आणि अटी तटीचे चे सामने झाले. यावेळी भरपूर उत्साह, आवडीनुसार कॅामेंट्री, विनोदाचा मसाला, कोपरखळ्यांची फोडणी, दाद आणि प्रतिसादांची सजावट आणि बॅट आणि बॅाल, खेळाडू यांची जुगलबंदी ने ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. या वेळचे प्रथम पारितोषिक व चषक रोख पारितोषिक- ११,१११ (सौजन्य- मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव) मिरी संघाने पटकावली. द्वितीय पारितोषिक व रोख रक्कम- ७,७७७ ( सौजन्य - सागर आमले सरपंच अंभोरा ) राजमुद्रा क्रिकेट क्लब सावरगाव यांनी तर तृतीय पारितोषिक व रोख रक्कम- ५,५५५ (सौजन्य - राजमुद्रा व शिवशक्ती क्रिकेट क्लब) जोमदरा तांडा संघाने पटकावले. ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडण्यासाठी संयोजक मंडळाला मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष चितळे सर,डॉ.वसंत म्हस्के, प्रा.डॉ.म्हातारदेव म्हस्के, अशोक शेठ म्हस्के,संदिप म्हस्के, राजेंद्र म्हस्के सरपंच,ज्ञानेश्वर



गायखे सर, घनश्याम मेजर,नितीन चंदनशिव,सोमनाथ मेजर,अंकुश गुरूजी, बाळासाहेब म्हस्के मेजर, महेश म्हस्के,भद्रीनाथ भगत सर, उस्मान शेख, योगेश म्हस्के,पोपट गवळी, देविदास म्हस्के, संतोष म्हस्के,प्रविण चंदनशिव, गणेश म्हस्के,सचिन चंदनशिव, ज्ञानदेव म्हस्के आणि बंडू म्हस्के तसेच सर्वच राजमुद्रा व शिवशक्ती क्रिकेट क्लब मधील सिनीयर आणि ज्युनियर खेळाडूंनी हिरारीने सहभाग घेतला. त्यांच्या या सहभागाबद्दल संयोजक मंडळाच्या वतीने खूप खूप आभार व्यक्त करण्यात आले.

# अब्दुल सत्तार औरंगजेब, मी शिवाजी: भाजप नेते रावसाहेब दानवे यांचे वादग्रस्त विधान

**प्रतिनिधी ।** मुंबई

भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी स्वतःची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करत शिवसेना आमदार अब्दुल सत्तार हे औरंगजेब असल्याची टीका केली आहे. या प्रकरणी त्यांनी शिवाजी महाराजांचा उल्लेख एकेरी केल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी त्यांचा चांगलाच समाचार घेतला आहे. या प्रकरणी त्यांनी दानवेंना एकदा आपले तोंड आरशात पाहण्याचा सल्ला दिला आहे.

रावसाहेब दानवे यांनी शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात पत्रकारांनी त्यांना सिल्लाड, कन्नड व फुलंब्री विधानसभा मतदारसंघात महायुतीचा धर्म पाळला जाईल का? असा प्रश्न केला. त्यावर दानवे म्हणाले, महायुतीत सिल्लोड विधानसभा मतदारसंघात जेवढा युतीधर्म निभावला जाईल, तेवढीच माझी साथ कन्नड, फुलंब्री व भोकरदन मतदारसंघात असेल. सिल्लोडमध्ये महायुतीच्या धर्माचे पालन झाले नाही, तर आम्ही महायुतीच्या धर्माविरोधात फटाके फोडू.



अब्दुल सत्तार काय बोलतात ते सोडा. औरंगजेब काय बोलतो, ते मला शिवाजीला का विचारता? सत्तार यांना सिल्लोडच्या लोकांवर छाप टाकण्याचा प्रयत्न आहे. पण ते या निवडणुकीत चालणार नाही. अब्दुल सत्तार यांनी स्वतःची भाषा सुधारली पाहिजे. संयमाने वागले पाहिजे. तुम्ही जनतेचा आदर केला नाही तर जनताच तुम्हाला तुमची जागा दाखवेल, असे दानवे म्हणाले. याद्वारे त्यांनी एकप्रकारे स्वतःची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केली. तसेच त्यांचा एकेरी उल्लेखही केला.

दानवेंनी स्वतःचे तोंड आरशात पहावे

दुसरीकडे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकेरी उल्लेखावरून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी यांनी रावसाहेब दानवे यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी अब्दुल सत्तार यांच्यावर टीका करताना स्वतःची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली. एवढेच नाही तर त्यांनी महाराजांचा एकेरी उल्लेखही केला. त्यांना आमची विनंती आहे की, स्वतःची तुलना शिवाजी महाराजांशी करताना आपले तोंड आरशात पहावे.

आपण बोलताना स्वतःची तुलना कुणाशी करतो, याची राजकीय अक्कल तुम्हाला असली पाहिजे. मी एक शिवप्रेमी म्हणून रावसाहेब दानवे यांच्या विधानाचा जाहीर निषेध करतो. त्यांनी तत्काळ माफी मागावी. अन्यथा महाराष्ट्रातील शिवप्रेमी जनता त्यांचे राजकारण इतिहासजमा करेल. देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणी दानवे यांना माफी मागण्याची सूचना करावी, असे मिटकरी यांनी म्हटले आहे.

# बीड शहरात ब्रह्मतेज स्त्री संघाकडून वस्तू विक्री प्रदर्शन

## मतदान जागृती अभियान विषयावर रांगोळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी ।** बीड

**दिवाळीचे औचित्य साधून बीड येथील ब्रह्मतेज स्त्री संघाकडून हस्तकलावस्तू प्रदर्शन विक्री आणि विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जनजागृती व्हावी व मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून सौ. सुरभि खोपटीकर यांच्या संकल्पनेतून 'मतदान जागृती अभियान ' या विषयावर सुभाष रोडवरील अमृत मंगल कार्यालयात विद्यार्थीनींसाठी रविवारी (दि.२७) रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या रांगोळी स्पर्धेला विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला.**

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून उषा जोशी, डॉ.सीमा जोशी,सौ.वृंदा देशमुख, सौ.प्रणिता गंगाखेडकर, सौ. नहार यांची उपस्थिती होती. ब्रह्मतेज स्त्री संघाकडून नवरात्रोत्सवात नऊ दिवस ऑनलाइन व्याख्यानमालेचा उपक्रमही राबवण्यात आला होता. त्या ऑनलाइन कार्यक्रमाचे संचलन सौ.जागृती खडकीकर(औटी) यांनी केले. त्यावेळी सौ.कामाक्षी जोशी, सौ.प्रणिता गंगाखेडकर, सौ.साक्षी खडकीकर, सौ.डॉ.आश्विनी किन्हीकर, सौ.सुमती पिंगळे, सौ.ऋतुजा रामदासी, सौ.सुषमा भट, श्रीमती रत्ना हसेगावकर, कु. भक्ती जातेगावकर, सौ.अपर्णा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले होते. याप्रसंगी त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

ब्रह्मतेज स्त्री संघाच्या वतीने मतदान जागृती अभियान विषयावर रांगोळी स्पर्धमध्ये बीड येथील कु.ज्योती दीपक सर्वज्ञ ही सर्वप्रथम आली. तिने मतदान जागृतीसंबंधी प्रबोधनात्मक रांगोळी साकारली. तर सौ.पूजा शुभम जोशी हिचा रांगोळी स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला. कु.राधिका विनायक वझे तृतीय आली. लहान गटांसाठीच्या रांगोळी स्पर्धेत कु.दीप्ती विकास महाजन सर्वप्रथम, कु.अक्षरा गजानन साळुंखे द्वितीय, कु.वृंदा ज्ञानेश्वर केटे ही तृतीय तर कु.ऋतुजा जालिंदर काळे उत्तेजनार्थ ठरली. या सर्व विद्यार्थीनींचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देवून सत्कार करण्यात आले .रांगोळी स्पर्धेचे परीक्षण संस्कार भारती बीड चे जिल्हाध्यक्ष प्रमोद वझे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सुरभी खोपटीकर-पाचेगावकर यांनी केले. स्वतः तयार केलेल्या वस्तू, छोटे-मोठे व्यवसायिक यांना स्वतःच्या वस्तू च्या प्रचारासाठी व विक्रीसाठी एक



प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यामुळे अनेक छोट्या मोठ्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळाले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी , आयोजक सौ.रोहिणी बाभुळगावकर, सौ.सारिका गोले,सौ.शुभांगी पाठक, सौ.रूपालीसुलाखे,सौ.भक्ती कास्तीकर, सौ.मीरा वैद्य, सौ.अनिता खडकीकर, सौ.कविता देशमुख, सौ.संगीता घायाळ आदींसह ब्रह्मतेज स्त्री संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



# कृषी पर्यवेक्षक श्री महेश स्वामी यांचा कृषी विषयक कामाचा धडाका

**प्रतिनिधी ।** बीड

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री साळवे साहेब, तालुका कृषी अधिकारी श्री भगत साहेब आणि मंडळ कृषी अधिकारी सौ. चिरके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी पर्यवेक्षक श्री महेश स्वामी यांनी मल्टी टास्किंग ग्रेडर श्री सोमवंशी सर,कृषी सहाय्यक श्री जाधव संजय, श्री डुबे चांगुजी, श्री शांतीलिंग लामतुरे आणि श्री श्रीनिवास अंडील तसेच तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री बिपिन डरफे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री संतोष देशमुख व श्री ज्ञानेश्वर धस यांच्या साह्याने माननीय



बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन योजना(स्मार्ट कॉटन) अंतर्गत कापूस वेचणी पूर्व शेतकरी प्रशिक्षण कारी. गावंदरा, बोडखा, कासारी, भोपा,तेलगांव आणि चोंडी येथे घेतले. त्यामध्ये एका गावामध्ये एकाच वाणाचा कापूस जमा करणे, पहिल्या आणि दुसऱ्या वेचणीचाच काडीकचरा विरहित कापूस जमा करणे, एका गावातून कमीत कमी १०० कापसाच्या गाठी तयार करण्यासाठी ५०० क्विंटल कापूस जमा करणे, गटाच्या माध्यमातून गट प्रवर्तकाच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक पद्धतीने कापूस विक्री न करता कापसाच्या गाठी तयार करून विक्री करणे, कापूस जिनिंगला आल्यापासून पुढील प्रक्रिया जसे की लॉट तपासणे, करारनामा करणे आणि कापसाच्या गाठीला योग्य भाव मिळाल्यास विक्री करणे इत्यादी बाबींबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

कृषी विभागातील विविध योजनांविषयी, पी एम किसान सन्मान निधी योजनेविषयी, रवी हंगामातील पिकांच्या बीज प्रक्रिया संबंधी आणि रबी पीक विमा भरताना आपल्या शेतात जे पीक पेरले आहे त्याच पिकाचा विमा भरण्याबाबत घ्यावयाची काळजी इत्यादी बद्दल सखोल मार्गदर्शन केले. प्रत्येक गावातील कार्यक्रमासाठी तमाम शेतकरी बांधव उपस्थित राहिले.

# पैठण महाविकास आघाडीची आढावा बैठक संपन्न

## महाविकास आघाडीच्या उमेदवारास सर्वानुमते जाहीर पाठिंबा पैठण

**प्रतिनिधी ।** पैठण

**पैठणविधानसभा ११० आज पैठण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महाविकास आघाडीचे उमेदवार दत्तात्रय गोर्डे यांना पाठिंबा जाहीर करण्यासाठी आज आशीर्वाद मंगल कार्यालय येथे बैठक संपन्न झाली.महाविकास आघाडीतील काही उमेदवारांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले होते**

आज सर्व उमेदवार यांनी



उमेदवारी अर्ज मागे घेत महाविकास आघाडीचे दत्तात्रय गोर्डे यांना सर्वानुमते पाठिंबा दर्शवीला व महाविकास आघाडीचे उमेदवार यांना प्रचंड मताने निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहू असे सर्वांनी जाहीर केले या बैठकीत शिवसेना तालुका प्रमुख मनोज पेरे राष्ट्रवादी माजी आमदार संजय वाघचौरे माजी मंत्री अनिल पटेल काँग्रेस तालुकाध्यक्ष विनोद तांबे राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष गुलदाद पठाण एकनाथ कारखाना चे चेअरमन सचिन घायाळ ज्ञानेश्वर कापसे विकास गोर्डे राखी परदेशीं आदींची उपस्थिती होती



# तुळजापूर विधानसभा प्रकाश चव्हाणांनीच लढवावी बंजारा कार्यकर्त्यांची मागणी

तुळजापूर/ प्रतिनिधी

तुळजापूर:- तुळजापूर विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा बंजारा नेते प्रकाश चव्हाण यांनी अपक्ष उमेद्वार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने बंजारा समाजातील काही प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीचे आयोजन केले होते बैठकीत माजी सभापती प्रकाश चव्हाणांनीच तुळजापूर विधानसभा निवडणूक लढवावी अशी मागणी बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी केली.तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील गारवा पॅलेस येथे बंजारा समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत पंचायत समिती तुळजापूरचे माजी सभापती तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश चव्हाण यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कडे तुळजापूर विधानसभा उमेदवारीसाठी मागणी केली होती. पक्षश्रेष्ठीने उमेदवारी नाकारल्याने बंजारा समाजातील काही प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीत पक्षांने अन्याय केला असून प्रकाश चव्हाण यांनी ही निवडणूक लढवावी अशी विनंती केली. तर गेल्या २५ वर्ष काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ काम केली आहे पक्षश्रेष्ठीने उमेदवारी न दिल्यामुळे कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर तुळजापूर विधानसभा ही निवडणूक अपक्ष लढविण्याचा निर्णय घेतला आहे. आपण अपक्ष लढणार असल्याचे प्रकाश चव्हाण यांनी जाहीर केले. याप्रसंगी लक्ष्मण चव्हाण, राजु चव्हाण, लक्ष्मण राठोड, डॉ.वाय.के चव्हाण, कुमार राठोड, शिवाजी राठोड,

# गेवराई विधानसभा मतदार संघाला विकासाच्या नकाशात आणण्यासाठी एकवेळ संधी द्या-विजयसिंह पंडित

बीड (दै. महाभारत)

मागील निवडणुकीमध्ये आपला निसटता पराभव झाला, तरीपण खचलो नाही पुन्हा लोकांच्या कामासाठी घराबाहेर पडलो. सत्ता नसतानाही ग्रामीण भागाच्या विकासासाठी आपण विविध योजनांतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी खेचून आणला, सिंचनाची कामे केली, गेवराई विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांची अर्थवाहिनी ठरलेला जय भवानी कारखान अमरसिंह पंडित यांनी कार्यक्षमता वाढवून सुरु केला. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घरामध्ये आज दिवाळी होताना दिसत आहे. यापुढील काळात असे विविध कामे करून गेवराई विधानसभा मतदार संघाला विकासाच्या नकाशात आणण्यासाठी एकवेळ संधी द्या असे भावनिक आवाहन महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांनी मतदारांच्या गाठीभेटी दरम्यान केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित बीड येथील शिदोड येथून आपल्या प्रचार दौऱ्याला प्रारंभ केला. त्यानंतर आहेरलिंबगाव, बेलापूरी, लोळदगाव, कुर्ला, औरंगपुरा आदी गावांमध्ये कॉर्नर बैठका घेवून मतदाराशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, हा सर्व भाग बीड शहराला लागून असल्याने शिवछत्र परिवार नेहमीच आपल्या संपर्कात कायम राहिलेला आहे. मागील पंधरा वर्षांपासून शिवछत्र परिवाराने सत्ता नसतानाही या भागाच्या ग्रामीण विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. मागच्या निवडणुकीत आपला निसटता पराभव झाला, ऐनवेळी दोन्ही विरोधकांचा कावा न ओळखता आल्यामुळे आपली संधी हुकली, यावेळी मात्र आपण ती चूक करायची नाही. दोन्ही विरोधकांची छुपी युती आपल्या चांगलीच लक्षात आली आहे. त्यांचे कारस्थान ओळखून आपण सावध रहावे आणि उद्याच्या निवडणुकीमध्ये घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून मला विधानसभेत काम करण्याची संधी द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी बीड बाजार समितीचे उपसभापती शामसुंदर पडुळे, लिंबगावचे सरपंच शेख रईस, अशोक लांडे, राजाभाऊ नवले, गणेश सावंत, पांडुरंग शेंडगे, मधुकर धुमाळ, गणेश कदम, पांडुरंग शेंडगे, रमेश कदम, रंजित कदम, गणेश साळुंके, चंद्रसेन शेंडगे, दादाराव काळे, दिलीप कदम, संतोष जगताप, आसाराम भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अविनाश बापू कदम मित्रमंडळाचा विजयसिंह पंडित यांना पाठिंबा

अविनाश बापू कदम मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी विजयसिंह पंडित यांना पाठिंबा दर्शवत राष्ट्रवादीमध्ये जाहिर प्रवेश केला. मित्रमंडळाचे अविनाश बापू कदम, निलेश कदम, श्रीहरी सवासे, अक्षय साठे, अशोक साठे, राहुल लांडे, विजय कदम, अजय पाखरे, अशोक राऊत, नाना नाईकवाडे, संदिप खोमने, लहू खराडे, बबलू कदम, बाबुराव नरवडे, किशोर सोनवणे, महेश लोंढे, बाळासाहेब राऊत आदींनी विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश करून विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याचा संकल्प केला.

महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांचे प्रचार दौऱ्यात ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले.



# बीड जिल्ह्यात कोणाची बाजी, ६ पैकी ५ विधानसभेत महायुतीचं पारडं जड; पण शरद पवार अन् जरांगे पॅटर्न चर्चेत?

बीड : विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून लोकसभा निवडणुकांतील यशाचा आधार घेत व अपयशाला पाठीशी टाकत राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती यांच्यातच थेट सामना होणार असल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीनंतर संपूर्ण राज्याला विधानसभेचे वेध लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ३० जागांवर विजय मिळवणारी महाविकास आघाडी तर १७ जागांवर विजय मिळवणाऱ्या महायुतीमध्ये लढाई आहे. मात्र, मराठा आरक्षणाचा मुद्दा अद्यापही पूर्णतः निकालात न निघाल्याने मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे देखील सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण, लोकसभा निवडणुकांची मराठवाड्यात मनोज जरांगे पाटील इम्पॅक्ट दिसून आलाय. त्यात, बीड लोकसभा मतदारसंघात बीडचा खासदार बदलण्यातही मराठा आरक्षणाचा मुद्दा महत्वाचा ठरला. त्यामुळे, आता बीड जिल्ह्यातील ६ मतदारसंघात काय घडामोडी घडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरत आहे. बीड जिल्ह्यावर पहिल्यापासून दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडेंचा दबदबा राहिला आहे, त्यानंतर पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्याकडे जिल्ह्याचं नेतृत्व आल्याचं पाहायला मिळालं.

लोकसभा बीड लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बजरंग सोनवणे विजयी झाले, त्यांनी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव केला. त्यानंतर, भाजपनं विधानपरिषद निवडणुकीत पंकजा मुंडे यांना संधी दिलीय. त्यामुळे त्या विधानपरिषदेवर आमदार बनल्या आहेत. तर, परळी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे हेच उमेदवार आहेत. यावेळी, त्यांना पंकजा मुंडेंची देखील साथ असल्यामुळे त्यांच्या विजयाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. त्यासह, बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघातील राजकीय गणित काय, कोणता पक्ष आणि नेता बाजी मारणार याचीही चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे राज्यात महायुती व महाआघाडी अस्तित्वात आल्यानंतरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. त्यामुळे, महायुतीमध्ये कोणत्या पक्षाला किती जागा, व उमेदवार कोण याचीही उत्सुकता होती. दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडे सध्या एकच आमदार आहेत. तर, अजित पवार यांच्या पक्षाकडे तीन आमदार असून भाजपकडे २ आमदारांचं संख्याबळ आहे. सध्यातरी येथे दोन्ही शिवसेना व काँग्रेसला जागा सुटण्याची शक्यता नाही.



# नवाब मलिक यांच्या जावयाचे निधन

## अपघातात डोक्याला झाली होती गंभीर दुखापत, ४ आठवड्याची झुंज अयशस्वी

प्रतिनिधी । मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांचे निधन झाले आहे. समीर खान यांचा १७ सप्टेंबर रोजी भीषण अपघात झाला होता. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांच्यावर मागील ४ आठवड्यांपासून क्रिटी केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. आज त्यांची प्राणज्योत मालवली. समीर खान हे नवाब मलिक यांची मोठी मुलगी निलोफर मलिक हिचे पती होते. याबाबत नवाब मलिक यांनी सोशल मीडियावरून माहिती दिली.

नवाब मलिक म्हणाले, माझे जावई समीर खान यांचे निधन झाले आहे. अल्लाह त्यांना स्वर्गात सर्वोच्च स्थान देवो. समीर यांच्या जाण्याने आमच्या परिवाराचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील दोन दिवसांचे माझे सर्व नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहेत.

नेमके काय घडले होते?

नवाब मलिक यांचे जावई समीर खान आणि नवाब मलिक यांची मुलगी



निलोफर दोघे १७ सप्टेंबर रोजी क्रिटी केअर हॉस्पिटलमध्ये नियमीत वैद्यकीय तपासणीसाठी गेले होते. चेकअप केल्यानंतर निलोफर आणि समीर हे बाहेर आले. यावेळी गाडीत दोघे पती-पत्नी बसत असताना चालकाकडून अचानक अॅक्सीलेटरवर पाय ठेवला गेल्यामुळे ही कार समीर खान यांना फरकटत नेऊन एचडीआयएल वसाहतीच्या संरक्षण भिंतीजवळ जाऊन आदळली. या अपघातात समीर खान यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. तर, निलोफर यांच्या हाताला दुखापत झाली होती. दोघांनाही क्रिटीकेअर रुग्णालयात दाखल केले. समीर यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते.

# लोकसभेला शरद पवारांना खूश केले, आता मला करा

प्रतिनिधी । बारामती

लोकसभेला ताईला मतदान करून साहेबांना खूश केले, आता खालच्या निवडणुकीत मला खूश करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गावकऱ्यांना केले. ते दिवाळीनिमित्त दोन दिवस बारामतीत तळ ठोकून आहेत.

अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीवेळी तुम्ही बोलत नव्हता. परंतु तुमच्यात अंडर करंट होता. तेव्हा काही जण म्हणायचे की, साहेबांचं आता एवढं वय झालंय. या वयात जर सुप्रियाताई पडल्या, तर साहेबांना कसं वाटेल? मग लोकसभेला आपण ताईंना मतदान करू. लोकसभेला जे केलं ते मी स्वीकारलं. लोकसभेला ताईंना मतदान करून तुम्ही साहेबांना खूश केलं. बारामतीकरांवर माझाही तेवढाच अधिकार आहे. आता विधानसभेला खालची निवडणूक आहे. तर या निवडणुकीत दादाला खूश करा, असे मिश्कील वक्तव्य पवार यांनी केले. त्यावर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

प्रचार दौऱ्यावर असताना, उंडवडी सुपे गावात अजित पवार म्हणाले, मी बारामतीला तब्बल नऊ हजार



कोटी रुपयांचा निधी दिला आहे. हे कशामुळे झाले? कारण मी राज्याचा अर्थमंत्री होतो, असे त्यांनी सांगितले. एवढ्यावर न थांबता ते म्हणाले, वाढपी तुमचा असला की जेवायला मजा येते.

# उमेदवारांना प्रचारापासून रोखाल तर गुन्हे दाखल करू

प्रतिनिधी । बीड

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यामध्ये चोख बंदोबस्त ठेवण्यात येत असून लोकशाहीमध्ये कुठल्याही उमेदवाराला कुठेही प्रचार करता येतो, त्यांना अडवण्याचा प्रयत्न झाला अथवा त्यांना रोखलं गेलं तर दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल केले जातील. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस सज्ज असल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी म्हटले.

बीड लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी उमेदवारांना प्रचार करण्यापासून रोखण्याचे प्रकार घडले होते. विधानसभेत मात्र असे प्रकार सहन केले जाणार नसल्याचा एकप्रकार संदेश पोलिसांनी दिला आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघात एका उमेदवाराला अडल्याबाबतचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्या व्हिडिओच्या आधारे पोलिसांनी दहा ते बारा जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधिक्षक बारगळ यांनी म्हटले की,




उमेदवाराला प्रचारापासून कुणालाही रोखता येणार नाही. निवडणुकीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यामध्ये चोख

बंदोबस्त ठेवण्यात आला असून राज्य राखीव दलाच्या तसेच बीएसएफच्या चार तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जिल्हा पोलीस दल, होमगार्ड हेही काम पाहत आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी आम्ही करत असून असामाजिक तत्वाच्या लोकांवर करडी नजर असल्याचे बारगळ यांनी माध्यमांना सांगितले.



मराठा संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांची अंतरवली सराटी येथे भेट घेऊन बीड जिल्हा अध्यक्ष अॅड शेख शफीक भाऊ यांनी दिपावली व पाडव्याचे शुभेच्छा दिल्या .

# माजलगावात वाहन तपासणीत दोन लाखाची रक्कम सापडली!

प्रतिनिधी । बीड

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली असल्याने सर्वत्र वाहांनाची तपासणी सुरू आहे. माजलगाव येथील डडढ पथक प्रमुख साळवे व पोलीस कर्मचारी वाहन तपासणी करत असताना माजलगाव येथील केसापुरी कॅम्प, सदोळा चौक येथे दिनाक १/११/२०२४ रोजी एक वाजता सादोळा चौक येथे वाहन क्रमांक. चक१४ डए ९९३४ ची तपासणी केली असता वाहना मध्ये दोन लाखाची रक्कम सापडली. रक्कम बाबत विचारणा केली असता असताना रघुनाथ शंकर पडघनकर वय-२९ वर्षे, व्यवसाय मुकादम रा. ढोल



उमंरी ता. उमंरी जि. नादेड येथील असल्याचे सांगण्यात आले. त्याची चौकशी केली असता सांगण्यात आले की, राहुल निलेश दादाभाऊ पोखरकर रा. मंचर ता. खेड जि. नगर या मालकाकडे मुकादम म्हणुन कामाकाज करतात. पुणे चिंबळी गाव येथे एकुण १५ लेबर असुन सदर ठिकाणी पत्र्याचे शेड तयार करण्याचे काम करतात. मजुराने एक ते दीड महीण्यापासुन केलेल्या कामाचे पैसे २०००००/- रुपये निलेश पोखरकर यांनी दिल्याने सदर पैसे हे मजुरास (कोयत्यास) देण्यासाठी दिल्याने पैसे हे मजुराचे नातेवाईका समक्ष त्याचे घरी देण्याचे असल्याने गावाकडे जात असल्याची माहिती दिली. त्यावर त्यांनी सदर पैशाची पाहणी केली व सदर पैशा बाबत चौकशी करण्यासाठी सोबत स्टेशन माजलगाव शहर येथे यावे लागेल असे सांगितले. पोलीस स्टेशन येथे आल्याचे नंतर सदर पैशा बाबत डडढ पथक प्रमुख साळवे व पोलिसांना सर्व पुरावे दिल्याने पथकातील अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करुन, पैशाबाबत पुरावे दिल्याने चौकशी करून सोडून देण्यात आले. ही कारवाई डडढ पथक प्रमुख साळवे, जाधव, चव्हाण, भुजबळ, पोलीस कर्मचारी मोरे, पो. ना. खंडागळे, पो. ना. बांगर यांनी केली.

# कोविड काळात आईस लेकरू पारक असताना मा.आ.अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडीत तालुक्याच्या रुग्णांना आले मदतीला धावून

## शिवछत्र परिवाराने जीवाची परवा न करता रुग्णासोबत

सुमेध करडे ।तलवाडा

लोकहिताचा वारसा चालवणारेच काळाची गरज ओळखून विपरीत परिस्थितीला अनूकूल करण्याचे धाडस दाखवत असतात. साध्या आठवणीही नको वाटणाऱ्या २०२० व २०२१ च्या कोवीड काळात शिवछत्र कुटुंब, भैय्यासाहेब आणि विजयराजेंनी कोवीड रूग्णांची अविरत काळजी घेतली. मार्च ते जून २०२१ मधील कोवीडची दुसरी भयावह लाट भैय्यासाहेबांच्या कर्तुत्ववान व धीरोदात्तपणामुळे रोखून धरण्यासाठी जनसामान्यासह प्रशासनाला मदत झाली. हे गेवराई तालुकाच नाही तर बीड जिल्हा कधीही विसरणार नाही. सर्वत्र अंधकारमय वाटत असताना धीराचा, मदतीचा, आपुलकीचा हात पुढे करून सुखादुःखात कायम बरोबर राहणारा असा हा शिवछत्र परिवार आहे. यातून तालुक्यातील जनतेला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली असेल, ज्या ज्या वेळी तालुक्यावर काही संकट येत, ते नैसर्गिक आपत्तीचे असो कि आरोग्य विषयक असो त्या त्या वेळी हा परिवार आणि भैय्यासाहेब आश्वासक असा विश्वास बनून उभे राहतात. कोरोनाच्या काळात पहिल्या लाटेत अनेकांचे रोजगार गेले. अनेकांच्यावर उपासमारीची वेळ आली. ज्यावेळी इतर राजकीय मंडळी घरात बसुन होते आणि आजही आहेत. त्यावेळी मात्र शिवछत्र परिवारने हातावर पोट असणाऱ्या हजारो लोकांच्या घरी किराणा आणि धान्य पोहचवून अनेकांची मदत केली.

तर दुसऱ्या लाटेत सारी माणसे, शासकीय यंत्रना, रूग्णालय व्यवस्था हतबल झालेली असताना, ऑक्सीजन अभावी गुदमरणारा श्वास मोकळा करण्याच्या दृष्टिकोनातून जयभवानी शिक्षण संकुलात माजी आमदार श्री अमरसिंह पंडित (भैय्यासाहेब) यांच्या संकल्पनेतून २०० खाटांचे कोवीड केअर सेंटर सुरू करून खात्रीशीर दिलासा देण्याचे काम केले. व र.भ. अट्टल महाविद्यालयात बीड जिल्ह्यातील पहिले १०० खाटांचे महालांसाठी स्वतंत्र कोवीड केअर सेंटर उभारले. कोरोनाच्या वाढत्या आकड्यांमध्ये अनेक गरजूंना बेड मिळवण्यासाठी धडपड करावी लागत असताना या कोविड केअर सेंटरच्या माध्यमातून रुग्णांना सुविधा तर मिळालीच शिवाय आरोग्य यंत्रणांना देखील बळ मिळाले. यातून हाजारो रूग्ण बरे करण्याचे महत्कार्य शिवछत्र परिवाराच्या माध्यमातून साधले गेले.

सार जग, आपले कुटुंब, आप्त, सगे सोयरे हाताचे अंतर राखून वागत असतानांच्या काळात आलेपणाचा जो आधार शिवछत्र आणि भैय्यासाहेबांनी दिला तो आम्ही कदापी विसरणार नाही. या सेंटरवर सर्वात जास्त गुणकारी औषध जर कोणते ठरले असेल तर ते भैय्यासाहेबांचे मध्यवर्ती उभे राहून आस्थेवाईक चौकशी करणे अन् काळजी करू नका मी आहे म्हणून धीर देणे. व्यायाम, प्राणायाम, योगा सोबतच संगीत रजनी, भारूडांचे कार्यक्रम, टीव्ही, वर्तमानपत्रे याचाही कोवीड रूग्णांना लाभ झाला आणि लवकरात लवकर बरे होण्याचे प्रमाण १००% राहिले.

एवढेच नाही तर गेवराई जिल्हा उपजिल्हा रूग्णालयाला तीन व्हेन्टीलेटर मशीन, एक्स रे मशीन, पल्सऑक्सिमीटर, इसीजी मशीन सह अत्यावश्यक साहित्य दिले, विक्रमी रक्तदान शिबिर आयोजित केले, प्रत्येक आरोग्य केंद्राला एक एक आवश्यक कीटही देण्यात आली. आणि पुढील काळासाठी गेवराई उपजिल्हा रूग्णालयात ऑक्सीजन प्लांट साठी पाठपुरावा करून ऑक्सीजन निर्मिती सूरू करून एकप्रकारे भैय्यासाहेब यांनी कोरोना काळात गुदमरलेल्या माणसासह, प्रशासनाला देखील धैर्य देण्याचे काम केले. यातून अनेक रूगण बरे होऊन घरी सुखरूप परतले. अनेकांचे याविषयीचे बोल कायम लक्षात राहतील असेच आहेत, आभाराच्या भावना व्यक्त करतांना रुग्णांच्या डोळ्यातील अश्रू आणि आवाजातील ते कंप कायम परोपकाराची जाणीव करून देत राहतील.

हेच समाधान भैय्यासाहेब आणि शिवछत्र परिवाराला सत्तेपेक्षा मोलाचे वाटते. म्हणूनच आम्ही गेवराईर कायम त्यांच्या कडे आशेचा विश्वासार्ह, दिलासादायक कीरण म्हणून पाहतो. हे करण्यासाठी कोणतीही सत्ता लागत नाही किंवा सत्ता मिळवण्यासाठीही असे करणे गरजेचेच आहे असेही नाही, पण सामाजिक उत्तरदायित्वाची भावना आणि संकटकाळी मदतीला धाऊन येण्याची शिवछत्र परिवाराची वृत्ती निःसंकोच, निःस्वार्थी स्वरूपाची आहे. हे आपण सारेच जाणतो. लोकप्रतिनिधी म्हणून किंवा माणूस म्हणून कर्तव्य भावनेतून प्रत्येक संकटात शिवछत्र परिवार सामान्य माणसाच्या सोबत आधारवड म्हणून उभा आहे. याच वृत्ती आणि कृतीला या निवडणूकीतून भरघोस साथ द्याल हा विश्वास वाटतो.

## धारुर मध्ये भारतीय सैन्याच्या ईको बटालियन कडून स्थानिकांसाठी फराळाचा व स्नैहमिलनाचा कार्यक्रम



किल्लेधारुर / प्रतिनिधि

धारुर शहरात वास्तव्यास असलेल्या भारतीय सैन्याच्या १३६ ईको बटालीयन मधील सैनिकांनी दि.३ रविवार रोजी दिपावली निमित्त स्थानिका साठी फराळाच्यास्नेहमिलन सोहळ्याचे कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी शहरातील नागरीक व पत्रकार सहभागी होते.मराठवाड्यातील वनक्षेत्र वाढविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विद्यमाने प्रयत्न केले जात आहे. मराठवाड्यात सध्या केवळ ७ टक्के वनक्षेत्र असून याची वाढ करुन ३० टक्क्यापर्यंत नेण्यासाठी भारतीय सैन्याच्या १३६ ईको बटालियनकडे धारुर वनपरिक्षेत्रातील १३५ हेक्टर जमीनीसह विविध शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालये व वस्तिगृहात वृक्षारोपण करण्यात आले आहे. आज दि.३ रविवारी येथील इको बटालियनकडून ले.कर्नल अमित प्रभु यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळी निमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी या बटालियनचे हवालदार जलील शेख यांनी बटालियनच्या कार्याची माहिती दिली. यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक विठ्ठल वाघमोडे, पत्रकार अनिल महाजन यांनी दिवाळीच्या शुभेच्छा देऊन सिमेचे रक्षण करणाऱ्या भारतीय सैनिकांसोबत दिवाळी साजरी करण्याचा वेगळा अद्दितीय अनूभव व आनंदी क्षण असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी सुभेदार दिवेकर बळीराम, डॉ.बी.के. ठोंबरे, पत्रकार सय्यद शाकेर, हाजी सय्यद लायक, जगदिश तोष्णीवाल, पत्रकार दिनेश कापसे, विजयसिंह दिख्खत, सोनपेठहून विशेष उपस्थित राहिलेले शिक्षक सुकेश यादव, श्रीराम सिकची, सुरेश पिलाजी, सिद्दीक तांबोळी, भैय्या तोष्णीवाल, नागनाथ सोनटक्के, हवालदार कृष्णा जाधव, हवालदार शेख जलील, शिपाई मुल्ला नबाब, प्रवीण शिंदे, दयानंद कदम आदी उपस्थित होते. याप्रसंगी सैनिकांकडून सर्वांना दिवाळीच्या फराळ अल्पोपहार व चहाची व्यवस्था करण्यात आली होती

शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वडवणी येथील

## युवकांचा उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत प्रवेश

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन व शिवसेनेचे नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब व शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब व शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव व सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराजजी सानप साहेब व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वडवणी तालुक्यातील युवा नेते एकनाथ पवार व त्यांचे सहकारी अमोल आडे, कृष्णा राठोड, संतोष आडे, अस्लम सय्यद, शेख इम्रान, अजय पवार, शिवाजी पवार, अतुल आडे, विकास राठोड, अजय शेजुळ, यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात) प्रवेश केला.

यावेळी शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी त्यांचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)परिवारात शिवबंधन



बांधून स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद वाढली असून माजलगाव विधानसभेतील अनेक नवतरुण व इतर पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करण्यास इच्छुक आहेत असे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी यावेळी सांगितले.

शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्यावर माजलगाव मतदारसंघाची जबाबदारी आल्यापासून या भागामध्ये जिल्हाप्रमुखांच्या माध्यमातून उत्तम संघटन, नव्या जुन्याचा मेळ घालून या भागात शिवसेनेची ताकद वाढताना दिसून येते आहे.माजलगाव, धारुर व वडवणी येथील अनेक इतर पक्षांतील युवक येणाऱ्या काळामध्ये जिल्हाप्रमुखांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश करण्यासाठी इच्छुक आहेत...

याप्रसंगी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी युवकांच्या प्रवेश प्रसंगी सांगितले, तुमच्या सर्व अडी अडचणी प्रसंगी व सर्व सामान्यांच्या सुख दुःखात शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून मी आपल्या सोबत राहील....

शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांना पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री करण्यासाठी माजलगाव मतदारसंघातील शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी आपण सर्वांनी जोमाने कामाला लागायचे आहे.पुढील काळातही शिवसैनिकांनी निष्ठेने व प्रमाणीकपणे काम केल्यास महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांची ताकद वाढेल व त्यांना विजयी करण्यासाठी शिवसेनेचा मोलाचा वाटा राहील यात तिळमात्रही शंका नाही...याप्रसंगी युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक दिवे, सखाराम तात्या मोहिते, दीपक घोडके पाटील, विनोद गुंड पाटील, अजय गायकवाड, राकेश ढोले सह सर्व उपस्थित होते...!!

# प्रचार सोडून धनंजय मुंडे पोहचले आजारी जिवलग कार्यकर्त्याच्या मदतीला

## 'शरद, काळजी करू नकोस, दोन दिवसात बरा होशील' म्हणत रुग्णालयात जाऊन विचारपूस करत दिला धीर



## शरद कावरेंना पुढील उपचारार्थ लातूरला केले शिफ्ट

परळी - उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आणि त्यातच प्रचाराची धामधूम असताना स्वतः उमेदवार असलेल्या धनंजय मुंडे यांना आपला जिवलग कार्यकर्ता शरद कावरे एका आजारामुळे रुग्णालयात दाखल असल्याचे कळताच प्रचार सोडून धनंजय मुंडे यांनी थेट रुग्णालय गाठून आपल्या जिवलग सहकाऱ्याची भेट घेऊन चौकशी करून पुढील उपचारासाठी त्यांना लातूर येथे पाठवण्याची सोय करून दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी तसेच धनंजय मुंडे यांचे जिवलग सहकारी असलेले शरद कावरे यांना थायरॉईड व युरीन इन्फेक्शन मुळे अचानक त्रास होऊ लागल्याने आज कुटुंबीयांनी परळीतील डॉ. वैभव डुबे यांच्या दवाखान्यात ऍडमिट केले होते.याबाबत माहिती मिळताच धनंजय मुंडे थेट डॉक्टर डुबे यांच्या रुग्णालयात पोहोचले. आपल्या नेत्याला अडचणीच्या काळात धावून आलेले पाहून शरद कावरे यांना रडू कोसळले. यावेळी धनंजय मुंडे यांनी शरद कावरे यांच्या पाठीवर थाप मारत त्यांना धीर दिला. 'शरद तुला लगेच लातूरला शिफ्ट करतो, काळजी करू नकोस, दोन दिवसात बरा होऊन परत येशील' असा विश्वास धनंजय मुंडे यांनी शरद कावरे यांना व त्यांच्या कुटुंबीयांना दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी हेही उपस्थित होते.

त्यानंतर पुढील काही मिनिटातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या म्बुलन्स मधून शरद कावरे यांना लातूर येथील विवेकानंद रुग्णालयात शिफ्ट करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असून ते लवकरच बरे होतील असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. अगदी अज्ञात व्यक्ती नाही अडचणीला मदत करणारे म्हणून धनंजय मुंडे सुपरीचीत आहेत. त्यातच निवडणुकीचा प्रचार सोडून आपल्या जिवलग कार्यकर्त्याच्या मदतीला धावून गेल्याचे वृत्त समजताच धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे.



## २ नोव्हेंबर रोजी टायगर ग्रुप ऑफ इंडिया चे सर्वेसर्वा राष्ट्रीय अध्यक्ष मा. पै.डॉ.तानाजी

भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त टायगर ग्रुप मराठवाडा अध्यक्ष मा.पै. गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर, बीड जिल्हा उपाध्यक्ष पैलवान अतुल भाऊ करंडे, मार्गदर्शक दत्तात्रय आप्पा जमाले पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली, व टायगर ग्रुप वडवणी तालुका अध्यक्ष अजित गालफडे यांच्या संकल्पनेतून. टायगर ग्रुप वडवणी तालुका कडून .पसायदान सेवा प्रकल्प अनाथाश्रम अन्नदान, करण्यात आलं व वडवणी पोलीस स्टेशनमध्ये वृक्षारोपण, लावण्यात आले व गोरगरीब लोकांना मिठाईवाटप, तर वडवणी सरकारी हॉस्पिटल मध्ये रुग्णांना फळवाटप, करण्यात आले असे अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात आले....

यावेळी उपस्थित टायगर ग्रुप वडवणी तालुका पदाधिकारी...

विशाल राऊत ,प्रदीप होके, केशव सोळंके, पांडू नानवर ,अजिंक्य घोलप ,साई कदम, आकाश आव्हाड, अमोल चव्हाण, शरद राठोड, रोहित काकडे ,पिनू घोडके, अक्षय पंधारे, विशाल मुजमुले, अशोक सावंत ,एकनाथ बनगे, सुमित इथापे, अभिषेक हातागळे, दत्ता कदम, परमेश्वर जाधव ,मुकेश आव्हाड, उमेश माळी....

प्रदीपभैया गलांडे,रोहीत घुगे ,अनिकेत घोलप,हर्षधन घुगे विकास घोलप,शुभम घोलप,राहूल पांडव चंद्रकांत गलांडे

राहूल घोलप,सिद्धू शिनगारे ,ज्ञानेशोर क्षिरसागर ,रणजीत गायकवाड ,रमेश साळवे ,यश सूरवसे ,गजानन माने ,विजय फरताडे ,बाळू चादर ,भागवत माळी ,उमेश माळी ,मधुकर गव्हाणे ,शिवाजी शेंडगे,कृष्ण गव्हाणे ,योगेश शिंदे,संतोष गव्हाणे ,पंकज जाधव ,रोहन मुजमुले ,गणेश साळवे ,अजित सोनवणे , ,गोविंद नानवर सुमित डोंगरे ,सुरेश नेटके ,आकाश तौरे ,नितीन नानवर महादेव नेटके ,रामभाऊ नाणवर ,अनंत मुंडे ,अतुल पाटोळे ,वैभव मूजमुले,अनिल मूजमुले,विजय मूजमुले,शुभम मूजमुले,निखील मूजमुले,अशोक मूजमुले,सुनील मूजमुले, ,सूरज आव्हाड ,महेश पायके ,रोहीत सौदने ,महेश शिंदे , ,विजय हतागळे,कृष्णा हतागळे,आदित्य हतागळे,बाळू हतागळे तानाजी हतागळे,संजय चव्हाण ,गणेश चव्हाण राहूल चव्हाण,आकाश चव्हाण

कृष्णा चव्हाण,अजय चव्हाण,अनिल चव्हाण, ,विकास पवार,सुनील र्हीह राठोड,विलास,राठोड,यूराज,चव्हाण ,विकास राठोड , संपूर्ण टायगर ग्रुप सदस्य व मित्रपरिवार इत्यादी उपस्थित होते

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT